६५/१.वि.

शासन निर्णयाच्या / परिपत्रकाच्या प्रती राजकीय पक्षांना पाठविण्याबाबत.

20160107110149520७

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १०००/२७२/१८ (रवका),
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ मे, २०००.

परिपत्रक :

शासनाचे निरनिराळे शासन निर्णय/परिपत्रके शासनाच्या प्रत्येक विभागाकडून प्रसिध्द होतात. परंतु या शासन निर्णय/परिपत्रकाची माहिती जनतेपर्यंत पोहोचत नाही तसेच शासन निर्णय/परिपत्रक मागणी केल्यास सहज मिळत नाहीत.

पारदर्शक प्रशासनाची संकल्पना विचारात घेता शासनाने घेतलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जर ती मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना उपलब्ध करुन दिली तर ती माहिती जनतेपर्यंत त्वरित पोहोचण्यास मदत होईल. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, महत्वाच्या विषयावर निरनिराळया विभागांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या/परिपत्रकाच्या ५/५ प्रती मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या केंद्रीय कार्यालयांना पाठविण्यात याव्यात. जेणेकरुन शासन निर्णयातील/परिपत्रकातील तरतुदी जनतेस उपलब्ध होतील. मात्र गोपनीय असलेल्या शासन निर्णयाच्या/परिपत्रकाच्या प्रती राजकीय पक्षांच्या कार्यालयांना पाठविण्यात येऊ नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मनीषा शिंत्रे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.